जा.क्र.नमुंमपा/शिक्षण/ ६४५ /२०२०
दि. १८/०३/२०२०

# जाहीर आवाहन

शासनाने कोरोना विषाणूचा प्रादुर्भाव रोखण्यासाठी महाराष्ट्र राज्यात साथरोग प्रतिबंधात्मक अधिनियम १८९७ ची दि. १३/०३/२०२० पासून अंमलबजावणी सुरु झालेली आहे. त्याअनुषंगाने करावयाच्या उपाययोजनांबाबत नियमावली वजा आदेश शासनाकडून निर्गमित करण्यात आलेले आहेत. त्यानुसार साथरोग अधिनियमाच्या खंड २ (१) नुसार महानगरपालिका आयुक्त हे सक्षम प्राधिकारी घोषित करण्यात आले आहे व त्यांना त्यांच्या कार्यक्षेत्रात कोव्हीड-१९ वर नियंत्रण आणण्यासाठी व त्याचा प्रादुर्भाव रोखण्यासाठी ज्या उपाय योजना करणे आवश्यक आहे त्या करण्यासाठी ते सक्षम प्राधिकारी असतील असे कळविण्यात आले आहे.

कोरोना विषाणूचा प्रादुर्भाव रोखण्यासाठी महापालिका कार्यक्षेत्रातील सर्व खाजगी शिकवणी वर्ग तसेच खेळवाडी (प्ले ग्रुप) व डे केअर तात्काळ पुढील आदेश होईपर्यंत बंद करण्याल यावेत.

कोणतीही संस्था/संघटना/व्यक्ती यांनी या नियमावलीतील नियमांचे उल्लघन केल्यास ते भारतीय दंडसंहिता (४५ ऑफ १८६०) च्या कलम १८८ नुसार दंडनिय/कायदेशीर कारवाईस पात्र राहतील.

आयुक्त
नवी मुंबई महानगरपालिका

Scanned by CamScanner